# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**<u>प्रस्तावना</u> :-** प्रभाग क्र. 29, मौजा हुडकेश्वर, येथील स्वामी समर्थ मंदिर
**{क्रीडा व सांस्कृतिक विभाग}** जवळ, चंदनशेष नगर मैदानाचा विकास करण्यात येणार आहे. त्यास मा. आयुक्त महोदय यांची दि. 12.08.2025 रोजीची मान्यता प्राप्त आहे. याकरीता स्थापत्य कामे करण्याचे दृष्टीने बोलविण्यात आलेल्या निम्नत्तम निविदेतील मे. व्ही. एफ. धंडारे यांची – 33.666 % कमी दराच्या निविदेला मा. आयुक्त म.न.पा. नागपूर यांनी दि. 03.11.2025 रोजी मंजूरी प्रदान केलेली आहे.

सबब कामाकरीता मे. व्ही. एफ. धंडारे यांनी करावयाच्या कामाची निविदा राशी रू. 33,52,987/- कामाचा वीमा रू. 50,547/- लेबर इन्शुरन्स रू. 50,547/- रॉयल्टी चार्जेस रू. 92,100/- टेस्टींग चार्जेस रू. 49,315/- GST 18 % रू. 603538/- एकूण रू. 41,99,034/- राशीचा कार्यादेश निर्गमित करण्याचा प्रश्न विचारात घेण्यास्तव मा. आयुक्त तथा प्रशासक यांचे मान्यतेस्तव सादर.

**टिप :-** सविस्तर टिप्पणी नस्तीमध्ये उपलब्ध आहे.

## <u>पारीत ठराव</u>

**ठराव क्रमांक :-** 372/**स्थायी समिती/प्रशासक** **दिनांक :-** 07/11/2025

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता, क्रीडा व सांस्कृतिक विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार प्रभाग क्र. २९, मौजा हुडकेश्वर, येथील स्वामी समर्थ मंदिर जवळ, चंदनशेष नगर मैदानाचा विकास करण्यात येणार आहे. त्यास मा. आयुक्त महोदय यांची दि. १२.०८.२०२५ रोजीची मान्यता प्राप्त आहे. याकरीता स्थापत्य कामे करण्याचे दृष्टीने बोलविण्यात आलेल्या निम्नत्तम निविदेतील मे. व्ही. एफ. धंडारे यांची – ३३.६६६ % कमी दराच्या निविदेला मा. आयुक्त म.न.पा. नागपूर यांनी दि. ०३.११.२०२५ रोजी मंजूरी प्रदान केलेली आहे.

सबब कामाकरीता मे. व्ही. एफ. धंडारे यांनी करावयाच्या कामाची निविदा राशी रू. ३३,५२,९८७/- कामाचा वीमा रू. ५०,५४७/- लेबर इन्शुरन्स रू. ५०,५४७/- रॉयल्टी चार्जेस रू. ९२,१००/- टेस्टींग चार्जेस रू. ४९,३१५/- GST १८ % रू. ६०३५३८/- एकूण रू. ४१,९९,०३४/- राशीचा कार्यादेश निर्गमित करण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.